सरकार तर्फे साक्षीदार क्र.७ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव - दत्तात्रय वासुदेव रणदिवे

वय-५४ व्यवसाय – महसुल सहाय्यक तहसिलकार्यालय माळशिरस

रा -तहसिल कार्यालय माळशिरस

## सरतपासणी सरकार तर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती डी.बी.पाटील

१. सन २०११-१२ मध्ये मी सांगोला तहसिल कार्यालयात पुरवठा शाखेत लिपीक म्हणुन कार्यरत होतो. पुरवठा शाखेमार्फत शासकीय धान्य वाटपाचे काम केले जाते. धान्याचा पुरवठा सांगोला तालुक्यातील प्रत्येक गावात शासनमान्य धान्य पुरवठा दुकान व वैयक्तीक दुकान यांना गावातील कार्ड संख्येप्रमाणे केला जातो. कोळेगाव हे सांगोला तालुक्यातील गाव आहे. परवाना घेण्यासाठी प्रत्येक गावातील पुरवठा दुकानदार आमचे कार्यालयात येत असतात. कोळेगाव विकास सेवा सोसायटीचे शासनमान्य धान्य पुरवठा दुकान होते. सन २०११-१२ साली तेथे काय झाले होते ते मला आठवत नाही. शासनमान्य धान्य दुकानात धान्याचा पुरवठा हा वितरण शाखेतील ठेकेदारामार्फत केला जातो. ठेकेदाराने कोणत्या शासनमान्य धान्य दुकानाला किती धान्य दिले त्याची नोंद शासनाच्या धान्य गोडाऊनमध्ये केली जाते. धान्य वाटपाचा मासिक गोषवारा तहसिल कार्यालयात काढला जातो. शासनामार्फत गहु, तांदुळ, रॉकेल, पामतेल, साखर याचा पुरवठा केला जातो. आप्पासाहेब माने हे कोळेगावात विकास सेवा सोसायटी मार्फत धान्य दुकान चालवत होते. मी आप्पासाहेब माने यांना त्यावेळी पाहिले आहे. आज आरोपी म्हणुन हजर असलेल्यांमध्ये आप्पासाहेब माने हजर आहेत. मला पेपर वाचल्यावर आप्पासाहेब माने यांनी शासकीय गहु व तांदुळ हा व्यापा-यांना विकला अशी बातमी समजली. त्यानंतर मला त्याबाबत काही समजले नाही.

## उलटतपास आरोपी क्र.१,३ तर्फे विधिज्ञ श्री. यु.व्ही.लोखंडे वकील

२. सन २०११-१२ मध्ये मी सांगोला तहसिल कार्यालयात पुरवठा विभागात लिपीक म्हणुन कार्यरत होतो. पुरवठा विभागात एकुण ४ कर्मचारी होते. त्यामध्ये ३ वरिष्ठ लिपीक होते. त्यावेळच्या पुरवठा अधिका-यांचे नाव मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की,

पुरवठा अधिकारी हे तहसिलदार यांचे हाताखाली काम करीत होते. हे म्हणणे खरे आहे की, धान्य पुरवठयाचे काम पुरवठा अधिकारी व वरिष्ठ लिपीक यांचे मंजुरीने केले जायचे. हे म्हणणे खरे आहे की, माझेकडे मंजुरी देण्याचे काम नसायचे. हे म्हणणे खरे आहे की, आप्पासाहेब माने यांना मासिक किती धान्य दिले याचा माझे कामाशी प्रत्यक्ष संबंध नाही. त्यामुळे मला याबाबत काही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिसांकडे दिलेला जबाब हा मी वर्तमानपत्रात वाचलेल्या बातमीच्या आधारे ऐकिव दिला. हे म्हणणे खरे आहे की, मी जे वर्तमानपत्र वाचले ते पोलिसांकडे हजर केलेले नाही.

**उलटतपास आरोपी क्र.२,४ तर्फे विधिज्ञ श्री.ए.एम.पटेल वकील**

३. हे म्हणणे खरे आहे की, आप्पा माने हे पुरवठा विभागात त्यांच्या दुकानाच्या संबंधाने माल नेण्यासाठी येत असतात. हे म्हणणे खरे आहे की, आप्पा माने हे पुरवठा विभागात नेहमी येत असल्याने मी त्यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, मी वर्तमानपत्रात जी बातमी वाचली त्याबाबत मला वैयक्तीक माहिती नाही.

**उलटतपास आरोपी क्र.५ तर्फे विधिज्ञ श्री.बी.आर.जिगजेनी वकील**

उलटतपास नाकारला.

उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

सही/-

सांगली.   ( पी.पी.केस्तीकर )

दिनांक १३/०४/२०२३.   मुख्य न्यायदंडाधिकारी, सांगली.